27 NOV 2022
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात आयोजित लोकशाही गप्पा भाग-८ अंतर्गत 'जगण्यातलं संविधान' या परिसंवादात मुक्ता दाभोलकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सचिन पवार, गायत्री लेले, डॉ. राहुल सरवटे, सॅबी परेरा, श्रीकांत देशपांडे, डॉ. दीपक पवार उपस्थित होते.

# संविधानिक मूल्यांच्या परिघातूनच आधुनिक भारताची उभारणी

## विद्यापीठात परिसंवाद : 'जगण्यातलं संविधान'चा घेतला वेध

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संविधानिक मूल्यांच्या परीघ विस्तारातूनच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची भक्कम उभारणी शक्य आहे. असा सूर शनिवारी शिवाजी विद्यापीठात आयोजित 'जगण्यातलं संविधान' या विशेष परिसंवादात उमटला.

संविधान दिनानिमित्त राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने 'जगण्यातलं संविधान'हा राज्यस्तरीय परिसंवाद विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्यासह अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या मुक्ता दाभोलकर, स्तंभलेखक सॅबी परेरा, प्रा. राहुल सरवटे, कीर्तनकार सचिन पवार, डॉ. गायत्री लेले सहभागी झाल्या.

दाभोलकर म्हणाल्या, संविधानाने दिलेले अधिकार हे आपल्या दैनंदिन जगण्यात अंगीकृत व परावर्तित होणे आवश्यक आहे. संविधानिक मूल्यांना सामाजिक स्वीकार्हता ही खूप महत्त्वाची बाब आहे.

परेरा म्हणाले, मी अभिव्यक्ती स्वातंत्र्य उपभोगणारा लेखक आहे. तथापि, सध्या भावना ही बाब खूपच संवेदनशील बनलेली आहे. त्यामुळे अभिव्यक्तीचा संकोच होऊ लागला आहे.

सरवटे म्हणाले, भारतासारख्या व्यामिश्र, व्यापक देश ब्रिटिशांकडून पराभूत होण्याचे कारण दोनप्रकारे सांगितले जाते. एक म्हणजे प्रथा, परंपरा, रुढीच्या प्रभावामुळे हरलो आणि दुसरे म्हणजे आपण प्रथा, परंपरा रुढीपासून दुरावलो म्हणून हरलो. या दोन उत्तरांमधील आंतरविसंगती दूर करण्याचे काम राज्यघटना करते.

डॉ. लेले म्हणाल्या, वर्गखोली ही लोकशाहीचा पुरस्कार करणारी जागा आहे. विविध मुद्द्यांवर विद्यार्थ्यांशी अधिक अर्थपूर्ण व खुलेपणाने चर्चा शक्य असते. संवाद हा त्याचा पाया आहे आणि प्रतिसाद हा त्यातील कळीचा मुद्दा आहे. त्या प्रतिसादातही पारदर्शकता ही महत्त्वाची बाब आहे.

कीर्तनकार पवार म्हणाले, आज आपण राज्यघटनेच्या 'आम्ही' या मूल्यापासून दूर जात व्यक्तीकेंद्री होत चाललो आहोत, हे थांबविले पाहिजे. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दीपक पवार यांनी परिसंवादाचे समन्वयन केले. पल्लवी जाधव यांनी आभार मानले.

27 NOV 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तरच आधुनिक भारताची भक्कम उभारणी शक्य

## शिवाजी विद्यापीठात 'जगण्यातलं संविधान' परिसंवादातील सूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'जगण्यातलं संविधान' परिसंवादात बोलताना मुक्ता दाभोलकर. शेजारी सचिन पवार, गायत्री लेले, डॉ. राहुल सरवटे, सॅबी परेरा, श्रीकांत देशपांडे, डॉ. दीपक पवार.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संविधानिक मूल्यांच्या परीघ विस्तारातूनच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची भक्कम उभारणी शक्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित 'जगण्यातलं संविधान' या विशेष परिसंवादामध्ये उमटला.

संविधान दिनानिमित्त राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकशाही गप्पा भाग-८' या कार्यक्रमांतर्गत 'जगण्यातलं संविधान' हा विशेष राज्यस्तरीय परिसंवाद राजर्षी शाहू सभागृहात झाला. मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्यासह अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या मुक्ता दाभोलकर, स्तंभलेखक सॅबी परेरा, कीर्तनकार सचिन पवार सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दीपक पवार यांनी संवादक म्हणून समन्वयन केले.

'अंनिस'च्या मुक्ता दाभोलकर म्हणाल्या, संविधानाने दिलेले अधिकार दैनंदिन जगण्यात अंगीकृत व परावर्तित होणे आवश्यक आहे. संविधानिक मूल्यांना सामाजिक स्वीकारार्हता खूप महत्त्वाची बाब आहे.

स्तंभलेखक परेरा म्हणाले, मी अभिव्यक्ती स्वातंत्र्य उपभोगणारा लेखक आहे. तथापि, सध्या भावना ही बाब खूपच संवेदनशील बनली आहे. त्यामुळे अभिव्यक्तीचा संकोच होऊ लागला आहे. विनोद आणि उपहास त्याला बळी पडत आहेत. राज्यघटनेचा वापर कशा पद्धतीने करतो, यावर तिचे भलेबुरेपण अवलंबून आहे.

कीर्तनकार सचिन पवार म्हणाले, राज्यघटनेच्या 'आम्ही' या मूल्यापासून दूर जात अधिकाधिक व्यक्तिकेंद्री होत चाललो आहोत, हे थांबवले पाहिजे. संविधानाचा व संतविचारांचा मूल्यात्मक गाभा समान आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

प्रा. राहुल सरवटे, डॉ. गायत्री लेले यांनी मनोगते व्यक्त केली. परिसंवादानंतर विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे मान्यवरांनी समाधान केले. पल्लवी जाधव यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ : 'जगण्यातलं संविधान' परिसंवादाचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संविधानिक मूल्यांच्या परीघ विस्तारातूनच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची भक्कम उभारणी शक्य आहे, असा सूर शनिवारी शिवाजी विद्यापीठात आयोजित 'जगण्यातलं संविधान' या विशेष परिसंवादामध्ये उमटला.

संविधान दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकशाही गप्पा भाग-८' या कार्यक्रमांतर्गत 'जगण्यातलं संविधान' हा विशेष राज्यस्तरीय परिसंवाद विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आला. त्यामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्यासह अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या मुक्ता दाभोलकर, स्तंभलेखक सॅबी परेरा, प्राध्यापक डॉ. राहुल सरवटे, कीर्तनकार सचिन पवार आणि प्राध्यापक डॉ. गायत्री लेले, प्रा. राहुल सरवटे, डॉ. गायत्री लेले, कीर्तनकार सचिन पवार, पल्लवी जाधव आदी उपस्थित होते.

27 NOV 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानिक मूल्यांचा परिघ विस्तारणे गरजेचे

'जगण्यातलं संविधान' परिसंवादात मान्यवरांचा सूर

## घटनेच्या वापरावर भलेबुरेपण अवलंबून

स्तंभलेखक सॅबी परेरा म्हणाले, "मी अभिव्यक्तीस्वातंत्र्य उपभोगणारा लेखक आहे. तथापि, सध्या भावना ही बाब खूपच संवेदनशील बनली आहे. त्यामुळे अभिव्यक्तीचा संकोच होऊ लागला आहे. विनोद व उपहास त्याला बळी पडत आहेत. राज्यघटनेचा वापर आपण कशा पद्धतीने करतो, यावर तिचे भलेबुरेपण अवलंबून आहे.'

कोल्हापूर, ता. २६ : संविधानिक मूल्यांच्या परीघ विस्तारातून आधुनिक भारताची भक्कम उभारणी शक्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित 'जगण्यातलं संविधान' विशेष परिसंवादात आज व्यक्त झाला.

संविधान दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे 'लोकशाही गप्पा भाग-८' या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय परिसंवाद झाला. राजर्षी शाहू सभागृहात त्याचे आयोजन केले होते.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्य मुक्ता दाभोलकर म्हणाल्या, 'संविधानाने दिलेले अधिकार आपल्या दैनंदिन जगण्यात अंगीकृत व परावर्तित होणे आवश्यक आहे. संविधानिक मूल्यांना सामाजिक स्वीकारार्हता महत्त्वाची आहे. समाजात प्रचलित रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविरोधात कायदा हतबल होणे गैर असून, संविधानाच्या कलम ५१-अ नुसार वैज्ञानिक मूल्यांचा प्रचार व प्रसार होणे, धार्मिकतेचा अंगीकार वैज्ञानिक विचाराधारित असणे आवश्यक आहे. संविधानिक मूल्यांचा स्वीकार, हीच खरी आधुनिक धार्मिकता आहे.'

प्रा. राहुल सरवटे म्हणाले, "भारतासारखा व्यामिश्र, व्यापक देश ब्रिटिशांकडून पराभूत होण्याची कारणे दोन प्रकारे सांगितले जातात. एक म्हणजे आपल्या प्रथा, परंपरा, रुढींच्या प्रभावामुळे हरलो आणि दुसरे म्हणजे आपण आपल्या प्रथा, परंपरा, रुढींपासून दुरावलो म्हणून हरलो. या दोन उत्तरांमधील अंतर, विसंगती दूर करण्याचे काम राज्यघटना करते. समता, बंधूता, सामाजिक न्यायाच्या आधारे आधुनिक भारताची त्याच्या सांस्कृतिक इतिहासाच्या समावेशासह बांधणी घटना करते. आपल्या शिक्षणाचे रूपांतर मूल्यांमध्ये होईल, तेव्हा खऱ्या अर्थाने देश सुशिक्षणाकडे वाटचाल करेल. राज्यघटना हे सामाजिक नीतिमत्तेबद्दलचे विधान आहे."

डॉ. गायत्री लेले म्हणाल्या, 'वर्गखोली लोकशाहीचा पुरस्कार करणारी जागा आहे. शिक्षकांसाठी वर्गखोली सुरक्षितस्थळ आहे. विविध मुद्द्यांवर विद्यार्थ्यांशी अधिक अर्थपूर्ण व खुलेपणाने चर्चा शक्य असते. संवाद हा त्याचा पाया आहे आणि प्रतिसाद हा त्यातील कळीचा मुद्दा आहे.'

कीर्तनकार सचिन पवार म्हणाले, "वारकरी संप्रदायामध्ये स्त्री-पुरुष संतांमधील संवाद हा समतेवर आधारित होता. माणूस म्हणून समोरच्या व्यक्तीचे मूल्य मान्य करणे आणि त्यांच्या अभिव्यक्तीचा सन्मान करणे, हा सर्वसमावेशकतेचा गुण आहे." यावेळी मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे उपस्थित होते. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दीपक पवार यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. पल्लवी जाधव यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'जगण्यातील संविधान' परिसंवादात बोलताना मुक्ता दाभोलकर. शेजारी डावीकडून सचिन पवार, गायत्री लेले, डॉ. राहुल सरवटे, सॅबी परेरा, श्रीकांत देशपांडे, डॉ. दीपक पवार.




कोल्हापूर : डॉ. दीपक पवार संपादित 'कशासाठी? लिंगभाव समतेसाठी' पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. तारा भवाळकर, मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, वंदना खरे, जिल्हाधिकारी राहुल रेखावार.

# माणूसपणाची संवेदना जपणे अत्यंत महत्त्वाचे

## डॉ. तारा भवाळकर यांचे प्रतिपादन

कोल्हापूर, ता. २६ : लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन माणूसपणाची संवेदना जपणे फार महत्त्वाचे आहे. स्त्री, पुरुष व तृतीयपंथी भेदांपलीकडे जाऊन माणूस म्हणून समता जपण्यास प्रारंभ करतो, तेव्हा खऱ्या अर्थाने आपण लिंगसमभाव प्रस्थापनेच्या दिशेने जाऊ, असे प्रतिपादन लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक व विचारवंत डॉ. तारा भवाळकर यांनी आज येथे केले.

संविधान दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे 'जगण्यातलं संविधान' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. दीपक पवार संपादित 'कशासाठी? लिंगभाव समतेसाठी' पुस्तकाचे प्रकाशन झाले. मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. या वेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

### सकारात्मकतेकडे घेऊन जाणारे पुस्तक

डॉ. भवाळकर म्हणाल्या, ''हे पुस्तक नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे घेऊन जाणारे आहे. स्त्री व माणूस म्हणून वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये जगताना स्त्रियांच्या अनुभवाचे संचित भल्याबुऱ्या अशा अनेकांगांनी वृद्धिंगत होत जाते. त्यामुळे दिवस साजरीकरणाच्या पलीकडे तिचे दैनंदिन जगणे सुकर आणि सुखकर होईल, या दिशेने काम करण्याची गरज त्यातून अधोरेखित होते.'

वंदना खरे म्हणाल्या, ''सामान्य नागरिकांचे लिंगभावसमतेविषयीचे मनोगत आणि अनुभवकथनाचे संकलन एवढेच या पुस्तकाचे महत्त्व नाही, तर संविधानाला अभिप्रेत समता व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मोल आणि मूल्य त्यातून जपले गेले आहे. खासगी अनुभव सार्वजनिकरित्या मांडणे, ही धैर्याची बाब आहे. हे धैर्य यातील लेखकांनी दाखविले आहे.''

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी संविधान व मतदार जागृतीच्या अनुषंगाने विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि निवडणूक कक्ष यांच्या माध्यमातून राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, निवडणूक कक्ष समन्वयक डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते

27 NOV 2022
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरच लिंगसमभाव प्रस्थापनेच्या दिशेने जाऊ : तारा भवाळकर

## 'कशासाठी? लिंगभाव समतेसाठी' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्त्री-पुरुष अगर तृतीयपंथी आदी भेदांच्या पलीकडे जाऊन जेव्हा आपण माणूस म्हणून समता जपण्यास प्रारंभ करतो, तेव्हा खऱ्या अर्थाने लिंगसमभाव प्रस्थापनेच्या दिशेने जाऊ, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. तारा भवाळकर यांनी शनिवारी केले. शिवाजी विद्यापीठ व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय यांच्या वतीने विद्यापीठातील शाहू सभागृहात शनिवारी झालेल्या संविधान कार्यक्रमात बोलत होत्या.

दरम्यान डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. दीपक पवार यांनी संपादित केलेल्या 'कशासाठी? लिंगभाव समतेसाठी' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे घेऊन जाणारे हे पुस्तक आहे. आज आपण साक्षर आहोत, हरेक लिंगभेदाच्या पलिकडे जाऊन माणूसपणाची संवेदना जपणे फार महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे आहे.



शिवाजी विद्यापीठात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. तारा भवाळकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. दीपक पवार, श्रीकांत देशपांडे, वंदना खरे, प्र. कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, जिल्हाधिकारी रेखावार उपस्थित होते.

साहित्यिक वंदना खरे म्हणाल्या, या पुस्तकात स्त्रियांबरोबरच एक तृतीयपंथी व दोन पुरुषांचे मनोगतही आहे. या पुस्तकातून त्यांना व्यक्त करण्याची संधी दिली आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, अभय जायभाये, डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढारी

# सर्व भेदांपलीकडे माणूस म्हणून समता जपल्यास लिंग समभावाची प्रस्थापना

## डॉ. तारा भवाळकर; विद्यापीठात संविधान दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्त्री, पुरुष अगर तृतीयपंथी आदी भेदांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून समता जपण्यास प्रारंभ करतो तेव्हा खऱ्या अर्थाने लिंगसमभाव प्रस्थापनेच्या दिशेने जाऊ, असे प्रतिपादन लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक व विचारवंत डॉ. तारा भवाळकर यांनी केले.

संविधान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, साहित्यिक वंदना खरे प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी मुंबई विद्यापीठाचे राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. दीपक पवार संपादित 'कशासाठी? लिंगभाव समतेसाठी' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, हरेक लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन माणूसपणाची संवेदना जपणे फार महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने हे पुस्तक महत्त्वाचे आहे. नकारात्मकतेकडून सकारात्कमकतेकडे घेऊन जाणारे हे पुस्तक आहे. स्त्री म्हणून आणि माणूस म्हणून वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये जगताना स्त्रियांच्या अनुभवाचे संचित भल्याबुऱ्या अशा अनेकांगांनी वृद्धिंगत होत जाते. त्यामुळे दिवस साजरीकरणाच्या पलीकडे तिचे दैनंदिन जगणे सुकर आणि सुखकर होईल, या दिशेने काम करण्याची गरज त्यातून अधोरेखित होते.

साहित्यिक खरे म्हणाल्या, सामान्य नागरिकांचे लिंगभावसमतेविषयीचे मनोगत व अनुभवकथनाचे संकलन एवढेच पुस्तकाचे महत्त्व नाही. संविधानाला अभिप्रेत समता व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मोल आणि मूल्य त्यातून जपले गेले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी संविधान व मतदार जागृतीच्या अनुषंगाने विद्यापीठ राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, निवडणूक कक्ष समन्वयक डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते.

महासत्ता

# संविधानिक मूल्यांच्या विस्तारातूनच आधुनिक भारताची उभारणी शक्य

**कोल्हापूर, ता.२६ (प्रतिनिधी)**

संविधानिक मूल्यांच्या परीघविस्तारातूनच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची भक्कम उभारणी शक्य आहे, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात आयोजित 'जगण्यातलं संविधान' या विशेष परिसंवादामध्ये उमटला.

संविधान दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकशाही गप्पा भाग-८' या कार्यक्रमांतर्गत 'जगण्यातलं संविधान' हा विशेष राज्यस्तरीय परिसंवाद विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आला. त्यामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्यासह अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या मुक्ता दाभोलकर, स्तंभलेखक सॅबी परेरा, प्राध्यापक डॉ. राहुल सरवटे, कीर्तनकार सचिन पवार आणि प्राध्यापक डॉ. गायत्री लेले सहभागी झाले. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दीपक पवार यांनी संवादक म्हणून परिसंवादाचे समन्वयन केले. यावेळी स्तंभलेखक सॅबी परेरा, प्रा. राहुल सरवटे, डॉ. गायत्री लेले, कीर्तनकार सचिन पवार यांची समयोचित भाषणे झाली.

लोकमत

# विद्यापीठात आज ज्येष्ठांसाठी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभाग कॅन्टीन परिसरात आज, रविवारी (दि. २७) सकाळी ८ वाजता सेबी अर्थतज्ज्ञ डॉ. विजय ककडे यांचे अर्थविषयक व्याख्यान होणार आहे. त्यामध्ये मोबाइल, इंटरनेटमार्फत होणारी फसवणूक, गुंतवणुकीच्या नवीन पर्यायी संधी, क्रिप्टो करन्सी आणि याबाबत होणारी फसवणूक टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेची माहिती ज्येष्ठ नागरिकांना देणार आहेत.

27 NOV 2022

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धा संपन्न

## वाकरे, गगनबावडा, गडहिंग्लज व मुरगूड महाविद्यालयांना चॅम्पियनशिप

मुरगूड, ता. २६ (प्रतिनिधी)–

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर विभागीय कुस्ती स्पर्धेत फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात दत्त द्वारका महाविद्यालय वाकरे ( २१ गुण ) 'पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालय गगनबावडा (१२ गुण)शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज ( ९ गुण ) यांना जनरल चॅम्पियनशिप मिळाली.

तर ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात दत्त द्वारका महाविद्यालय वाकरे(१०गुण) शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज (११ गुण) व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड (१० गुण ) या महाविद्यालयांना जनरल चॅम्पियनशिप मिळाली. १३० किलो वजनाखालील कुस्तीत शुभम शिदनाळे (शिवराज गडहिंग्लज) प्रथम आला. रणबीर पाटील (विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर) याने द्वितीय क्रमांक पटकावला तर तृतीय क्रमांक_ विश्वजीत नरंदे शहाजी महाविद्यालय कोल्हापूर यास मिळाला .



शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेतील अंतिम लढतीचे छायाचित्र.

या स्पर्धा लोकनेते सदाशिवराव मंडलिक साई आखाडा येथे पार पडल्या सदर स्पर्धेकरिता फ्री स्टाईल या कुस्ती स्पर्धेत ३१ महाविद्यालयाच्या १४५मल्लांनी तर ग्रीको रोमन या कुस्ती स्पर्धेत १४ महाविद्यालयाच्या ६४ मल्लांनी सहभाग नोंदवला होता अशा २०९ खेळाडूंनी दहा गटात आपले नशीब आजमावले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 NOV 2022
सकाळ

# गानहिरा डॉक्टर भारती वैशंपायन

कलासाधक

- प्रभाकर द. तांबट



भारतीताईंचा जन्म १ जानेवारी १९५४ मध्ये सांगली येथे एकत्र कुटुंबात झाला. वडील साहित्य, संगीतनाटकाचे रसिक तर आई व काका उत्तम संगीत जाणणारे त्यामुळे लहान वयातच नाट्यसंगीताचे तेही बालगंधर्व, प्रा. दीनानाथ व छोटा गंधर्व यांचे संस्कार त्यांच्यावर झाले. शाळेत तर पाहुण्यांसमोर आपल्या गोड आवाजात त्या 'स्वागतगीत' गायच्याच पण एकदा लग्नाच्या पंगतीत त्यांनी गायलेले 'शरण तुला भगवंता' हे भावपूर्ण भक्ती गीत ऐकून चिंतुबुवा म्हैसकर या बुजुर्ग गायकाने आपली तालीम घेण्यास त्यांच्या घरच्यांना सुचवले. पुढे शालेय शिक्षणाबरोबरच शास्त्रीय संगीत त्यांच्या गळ्यावर चढवताना विलंबित ख्याल गायन, विविध स्वरालंकार, रागाची मांडणी, तानक्रिया हे सर्व त्या बारा वर्षे चिंतुबुवांकडे शिकल्या व सतराव्या वर्षी त्या आकाशवाणीच्या मान्यताप्राप्त कलाकार झाल्या आणि आकाशवाणीवरून भजन, नाट्यसंगीत व सुगमसंगीत सादर करू लागल्या. पु. ल. देशपांडे, अरविंद मंगरुळकर यांसारख्या मान्यवरांसमोर बालगंधर्वांची पदे गाऊन त्यांनी वाहवा मिळवली. त्याचबरोबर कवि सुधांशु यांच्याबरोबर कार्यक्रमानिमित्त 'गीत दत्तात्रय' बऱ्याच गावांतून त्यांचे भक्ती कार्यक्रम झाले. संगीताचे हे कार्यक्रम करत असतानाच त्या बी. कॉम झाल्या व संगीतात करिअर करण्यासाठी कोल्हापूरला येऊन पं. सुधाकरबुवा डिग्रजकरांकडून संगीत शिक्षण घेऊ लागल्या तर चरितार्थासाठी सांगलीच्या 'शांतिनिकेतन' मध्ये नोकरी, सकाळी दहापर्यंत तीन तास रियाज, १० ते ६ नोकरी व ६ ते ९.१० पर्यंत पुन्हा म्हैसकरबुवा व भानुदासबुवा गुरव यांच्याकडे तालीम, शिवाय शनिवारी नोकरी आटोपून दुपारपर्यंत त्या कोल्हापूरला आल्या की रविवार सकाळ ते संध्याकाळी १२ तास तालीम व पुन्हा सांगलीला प्रयाण असे कष्ट त्यांनी गाण्यासाठी घेतले. सुधाकरबुवांनी 'शब्दकल्याण' रागाने तालीम देणे सुरू केले. विलंबीतची मांडणी, समचा उठाव, रागाची बलस्थाने अनपेक्षित सम गाठणे याचबरोबर ठुमरीचे शिक्षणही त्यांनी दिले. ज्यामुळे संगीताचे शास्त्र व रंजकता दोन्ही दृष्ट्या त्यांचे गाणे उठावदार व रंगतपूर्ण होई. याच वेळी ॲड. बाबूराव जोशींना त्यांचे गाणे आवडल्याने त्यांच्याकडूनही त्यांना ठुमरी, दादराचे शिक्षण तर मिळालेच पण खंबावती, शंकरा व इतर अनवट रागांचे शिक्षण त्यांना देऊन आपल्यासोबत मुलासमोर व शिक्षकांसमोर संगीत व्याख्याने देताना प्रात्यक्षिकासाठी भारतीताईंना त्यांनी बरोबर घेऊन दौरे केले. आकाशवाणी कलाकार झाल्यानंतर संगीताच्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी दिल्ली येथे गायन करून परीक्षा दिली व गौडसारंग व ठुमरी सादर करून त्यांना दोन वर्षांसाठी दरमहा ३५० रु. शिष्यवृत्ती सरकारकडून मिळू लागली. त्या कोल्हापूरला स्थायिक होऊन १९७७ मध्ये त्यांचा विवाह येथील अविनाश वैशंपायन यांच्याशी झाला. तोवर बाबूराव जोशींच्या धंदशास्त्रावरील वृत्तांचे रेकॉर्डिंग त्यांच्या आवाजात झाले व त्यांच्यासोबत संगीत प्रचारासाठी त्या महाराष्ट्रातील गावोगावी फिरल्या. लग्नानंतर त्यांनी संगीतातील 'मध्यमा', 'विशारद' पदव्या घेऊन १९८२ मध्ये एस. एन. डी. टी. विद्यापीठातून संगीत विषयात एम. ए. झाल्या त्याचबरोबर 'गानहिरा' पदवीने विद्यापीठाने त्यांना गौरवले. आकाशवाणीवरून राष्ट्रीय कार्यक्रमात त्यांनी शुद्धकल्याण, नंद व नायकी कानडा राग सादर केले. जे ऐकून निवृत्तीबुवा सरनाईकांनी त्यांना सुधाकरबुवांसोबत कोल्हापूरला ते येतील तेव्हा तालीम देण्याचे कळवले. निवृत्तीबुवांमुळे त्यांच्या गायनात तानांचे विविध सौंदर्यपूर्ण आकृतिबंध येऊन त्यांचे गायन परिपूर्ण झाले.

१९८४ मध्ये शिवाजी विद्यापीठात संगीतविभाग, ललितकलाविभागांतर्गत सुरू होणार होता. तेव्हा कुलगुरू व पं. मल्लिकार्जुन मन्सूरांनी त्यांची संगीतविभागप्रमुख म्हणून निवड व नेमणूक केली. या विभागाची आस्थापना, अध्यापन विभागासाठी स्वतंत्र इमारत, स्टुडिओ त्याचबरोबर चित्रकला, नृत्य व नाट्यविभाग हे विभागही त्यांनी सुरू केले. विभागप्रमुख होताना त्यांनी १२५ अनवट रागांचा अभ्यास करून गांधर्व महाविद्यालयाची संगीतप्रवीण (डॉक्टरेट) पदवी प्राप्त केली. त्यामुळे विभागांतर्गत विद्यार्थ्यांनी पीएच.डी. मिळण्याची व्यवस्था झाली. एकाअर्थी आज शिवाजी विद्यापीठाचा ललितकला विभाग मूर्त स्वरुपात दिसतो त्यामागे भारतीताईंचे मोलाचे योगदान आहे कारण विभागात, कोल्हापुरात देशातील पं. जसराज, शिवकुमार शर्मा, हरीप्रसाद चौरासिया, उस्ताद झाकिर हुसेन, गंगूबाई हनगल, मालिनी राजूरकर या उच्च कोटीच्या कलाकारांनी आपली कला 'राजर्षी शाहू संगीत रजनी' मध्ये सादर केली व घराणा सम्मेलन कोल्हापुरात घडून विविध घराण्यांतील कलाकारांचे गायन सादर झाले. सुमारे एक तप त्यांनी राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन केले. त्यांना दिल्ली येथील 'भारतज्योती', शिवाजी विद्यापीठाचा गुणवंत शिक्षक पुरस्कार, संगीतकार राम कदम पुरस्काराने सन्मानित केले. पन्नालाल घोष स्मृती समारोह, त्यागराज गानसभा हैदराबाद, कालिदास महोत्सव नागपूर, कोलकता येथील पश्चिम बंगाल संगीत महोत्सव आदी नामांकित मैफलीतून त्यांचे गायन झाले. अशा या चतुरस्त्र गायिकेचे १६ जानेवारी २०२० मधे अकाली निधन झाले.

(संदर्भ : स्नेहा राजूरीकर यांचे लेखावरून)